# नरखेड येथील आई व मुलाचे दुहेरी हत्याकांड करून उत्तर प्रदेश येथे पळुन जात असलेल्या आरोपीस नागपुर रेल्वे स्टेशनवरून अवघ्या ४ तासात स्थानिक गुन्हे शाखच्या पथकाने अटक करून खुनाचा उघड केला.



दिनांक ०७.०९.२०१९ रोजी सायंकाळी ०६:३० वाजता नियंत्रण कक्ष नागपूर (ग्रामिण) येथे माहिती प्राप्त झाली की, वार्ड क्रमांक ०८, स्वामी विवेकानंद चौक, नरखेड, जि.नागपूर येथील एका घरात आई व तीचे ४ वर्श लहान मुलाचा अतिशय निर्दयतेने खुन करण्यात आलेला आहे. अशा प्राप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन, त्यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक तयार केले. त्यातील एक पथक तात्काळ घटनास्थळ असलेले नरखेड येथे तर दुसरे पथक नागपूर शहरात आरोपीचे शोध कामी रवाना केले.

घटनास्थळी भेट दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अतिशय बारकाईने व गोपनीय पध्दतीने माहिती प्राप्त केली असता, दोन्ही मृतदेहां पैकी आईचा मृतदेह हा नामे १) श्रीमती प्रीयंका दिनेश साहु, वय २४ वर्ष, व मुलाचा मृतदेह हा २) कु. अनमोल दिनेभा साहु, वय ४ वर्ष, दोघेही राहणार ह.मु. नारायणराव वानखेडे यांचे घरी किरायाणे, वार्ड क्रमांक ०८, स्वामी विवेकानंद चौक,

नरखेड, जि. नागपूर (कायमचा पत्ता :- गाव दरीयापूर, पोस्ट गौराबुजूर्ग, त. खागा, जि. फत्तेपूर, उत्तर प्रदेश) असे असल्याचे समजले. तसेच मृतक महिलेचे पती दिनेश साहु हे आठवडी बाजारात नाशत्याचे हॉटेल लावण्याचा व्यवसाय करतात. त्यांचेकडे चार मजुर कामावर असुन, त्यातील रवि नावाचा मजुर हा कामावर गैरहजर राहत असल्याने, दिनेश साहु यांनी त्यास त्याचा हिशोब करून व पैसे घेवुन काम सोडण्यास सांगीतले. त्याचाच राग मनात धरून आरोपीत रवि याने दिनेश साहु व त्यांचे इतर तीन्ही मजुर हॉटेल व्यवसायासाठी बाहेरगावी गेल्याचा फायदा घेवुन दिनेश साहु यांची पत्नी व लहान मुलाचा खुन केला. घटनेनंतर रवि हा फरार असल्याने, रवि नावाचे इसमानेच दोन्ही मृतकांचा खुन केल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली.

प्राप्त माहितीवरून नागपूर शहरात आरोपीचे शोधकामी फिरत असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला माहिती मिळाली की, नागपूर येथील बीडीपेठ परिसरात वास्तव्यास असलेल्या राजेश साहु या इसमाने रवि यास दिनेश साहु यांचेकडील नरखेड येथील कामावर लावुन दिले होते. राजेश साहु या इसमाबाबत पोलीसांकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसतांना देखील, बीडीपेठ येथे पोलीसांनी तात्काळ राजेश साहु याचा शोध घेवुन त्यास सोबत घेतले. त्याचेकडुन पोलीसांनी आरोपीस याची माहिती प्राप्त केली असता, त्याचे पूर्ण नाव रवि संतोश पटेल, वय २७ वर्श, रा. गाव मजीला, त. बबेरू, जि. बंदा, उत्तर प्रदेश असे असल्याचे समजले.

आरोपीकडे मोबाईल नसल्याने, कोणत्याही तांत्रीक मदतीशिवाय आरोपी हा उत्तर प्रदेशातील आपल्या मुळ गावी पळुन जाईल या तर्क व अनुमानाचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नागपूर शहरातील बीडीपेठ, मोठा ताजबाग, छोटा ताजबाग, सक्करदरा तसेच नागपूर ग्रामीण हद्दीतील



कळमेशवर, काटोल, नरखेड रेल्वे स्टेशन या ठीकाणी आरोपीचा शोध घेतला. शेवटी मुख्य रेल्वे स्टेशन, नागपूर येथे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपी याचा शोध घेत असतांना, तेथील टिकीट काउंटरचे बाहेर प्रवाशांचे गर्दीचा फायदा घेवुन रक्ताने माखलेले कपडे परिधान करून लपुन बसलेला एक इसम पोलीसांचे नजरेस पडला. पोलीसांनी त्यास ताब्यात घेवुन त्याची विचारपूस केली असता, त्यांने त्याचे नाव रवि संतोश पटेल, वय २७ वर्श, रा. गाव मजीला, त. बबेरू, जि. बंदा, उत्तर प्रदेश असे सांगीतले. त्याचेकडे अधिक बारकाईने व सखोल विचारपूस केल्यानंतर त्यानेच नरखेडे येथे उपरोक्त उल्लेखीत प्रमाणे आई व तीचे लहान मुलाचा खुन केल्याची कबुली दिली. आरोपी यास ताब्यात घेवुन पुढील तपासकामी त्यास पोलीस ठाणे नरखेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण) यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन घटनेची सविस्तर माहिती प्राप्त केली व आरोपी यांचे अटकेबाबत योग्य मार्गदर्शन करून तात्काळ अटक करण्याबाबत आदेशीत केले.

सदर खुनाचे घटनेवरून फिर्यादी नामे दिनेश सीयाराम साहु, वय २९ वर्श, रा.ह.मु. नारायणराव वानखेडे यांचे घरी किरायाणे, वार्ड क्रमांक ०८, स्वामी विवेकानंद चौक, नरखेड, जि. नागपूर (कायमचा पत्ता :- गाव दरीयापूर, पोस्ट गौराबुजूर्ग, त. खागा, जि. फत्तेपूर, उत्तर प्रदेश)

यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नरखेडे येथे अप.क्र. ५७३/२०१९, कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन, पुढील तपास पोलीस ठाणे नरखेड हे करित आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण), मा. श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा नागपूर (ग्रामिण) यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री.अनिल जिट्टावार, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोउपनि सचिन मत्ते, पोहवा. जयप्रकाश शर्मा, सुनील मीश्रा, गजेंद्र चौधरी, नापोशी रामा आडे, सुरेश गाते, पोशि तुलाराम चटप, चालक पोहवा भाउराव खंडाते व चालक पोहवा. बावणे यांचे पथकाने केली आहे.



**तपासी अधिकारी**
पोनि.श्री.मल्लिकाअर्जुन इंगळे,
ठाणेदार, पोलीस स्टेशन नरखेड,